**(Should be Notarized on Rs. 100 Stamp Paper)**

हमीपत्र

मी ..................................., वय...............वर्षे, राहणार.......................... मे. ..................... ..................... (प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक कंपनीचे नाव) मध्ये ............................... या पदावर कार्यरत असून, या कंपनीने मला सदरचे हमीपत्र करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने घेतलेल्या ठरावानुसार प्राधिकृत केले आहे (सोबत कंपनीच्या संचालक मंडळाचा ठराव जोडला आहे). त्यानुसार आज दिनांक...............२०१५ रोजी असे हमीपत्र लिहून देतो की,

आम्ही ................. मे.वॅ. क्षमतेचा पवन ऊर्जा प्रकल्प गट नं. / सर्व्हे नं..........,. मौ............ ता............, जि............ येथे उभारणार आहोत / कार्यान्वित केला आहे. या हमीपत्राद्वारे मी कंपनीच्या वतीने अशी हमी देतो की सदर ठिकाणी प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे आम्ही सादर केलेली असून त्याबाबत व त्यांच्या सत्यतेबाबत आम्ही संपूर्ण जबाबदारी घेत आहोत.

या प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीसंबंधातील सर्व कायद्यांचे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकिनारवर्ती नियमांचे व इतर अनुषंगिक सर्व कायद्यांमधील तरतुदींचे आम्ही काटेकोरपणे पालन करू. तसेच या कायद्यांमधील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास व भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद, आरोप, तक्रार निर्माण झाल्यास, त्याचे निराकरण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील याची आम्हाला जाणीव असून ती बाब आम्हाला मान्य आहे.

आम्ही याद्वारे अशीही हमी देतो की, पवनऊर्जा प्रकल्प उभारणीपूर्वी व उभारणीनंतरच्या आवश्यक त्या सर्व कायदेशीर व वैधानिक बाबींची पूर्तता करू. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या सर्व परवानग्या, संमतीपत्रे व ना-हरकत प्रमाणपत्रे संबंधित विभागाकडून परस्पर प्राप्त करून घेवू तसेच संबंधित विभागांच्या नियमांचे पालन करणे आम्हास बंधनकारक राहील व याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. जमिनविषयक किंवा इतर कोणतीही वैधानिक परवानगी आमच्याकडून घ्यावयाची राहून गेली असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा आवश्यकता असल्यास किंवा कोणत्याही सक्षम प्राधिका-याने तसे निदेश दिल्यास अशी परवानगी प्राप्त करून घेणे आम्हाला बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासन / महाऊर्जाने निदेश दिल्यास आम्ही त्याचे अनुपालन करू. तसेच सदर हमीपत्रातील नमूद केलेल्या आमच्या प्रकल्पास / प्रकल्पांना शासनामार्फत जाहीर करण्यात आलेले दि. २० जुलै २०१५ रोजीचे धोरण व दि. ९ सप्टेंबर २०१५ रोजीच्या कार्यपध्दतीतील अटी / नियम / तरतुदी यथायोग्य लागू राहणार आहेत तसेच सदर प्रकल्पांना शासनाचे वेळोवेळीचे धोरण व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची नियमावली व आदेश आमच्यावर बंधनकारक राहील याबाबत आम्ही खात्री देत असून सदर बाब आम्हास मान्य आहे.

सदर पवनऊर्जा प्रकल्पासाठी दि. २० जुलै २०१५ रोजीचे धोरण व दि. ९ सप्टेंबर २०१५ रोजीच्या कार्यपध्दती अंतर्गत महाऊर्जा कार्यालयाकडे भरलेले रस्ते दुरूस्ती शुल्क आम्ही या प्रकल्पासाठी रस्ते वापरले असल्याने आमचा प्रस्तावित पवनऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाला नाही तरी आम्ही सदर प्रकल्पासाठी भरलेले रस्ते दुरूस्ती शुल्क परत मागणार नाही. तसेच शासन / महाऊर्जाने तसा आदेश दिल्यास / आवश्यकतेनुसार स्वखर्चाने रस्ते दुरूस्ती करू.

मी अशीही हमी देतो की भविष्यामधील जमीनविषयक / रस्तेविषयक / खनिकर्मविषयक किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या वादाची, आरोपाची व तक्रारीची कोणत्याही स्वरूपाची तोषीस / झळ शासनास / महाऊर्जास लागू देणार नाही. त्याचबरोबर भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद, आरोप, तक्रार निर्माण झाल्यास त्यामध्ये शासन / महाऊर्जा यांच्याकडून देण्यात येणा-या आदेश / सूचनांचे तंतोतंत पालन करू.

सदर पवनऊर्जा प्रकल्पाविषयी भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद, आरोप व तक्रार निर्माण झाल्यास आणि त्यामध्ये शासन / महाऊर्जा अथवा अन्य सक्षम प्राधिकाऱ्याने सदर जमिनीवरील पवन ऊर्जा प्रकल्प काढून टाकण्याबाबत आदेशित केल्यास आम्ही त्याचे विनातक्रार व विनाआक्षेप काटेकोरपणे अनुपालन करू.

दिनांक -

स्थळ -

मे. .................................................. यांचे

प्राधिकृत प्रतिनिधी